CMYK

# ‘आई राधा उदो उदो… येडुसरीचा उदो उदो…’

# येरमाळानगरी दुमदुमली; चुना वेचायला पंधरा लाखांच्यावर भाविकांची उपस्थिती

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.









**सुधीर लोमटे**
**येरमाळा, दि.३ एप्रिल -**

येथील आई येडेश्वरी देवीच्या चैत्र पोर्णिमा यात्रा राज्यातील मोठया प्रमाणात भरणारी यात्रा म्हणून यशस्वी यात्रा ठरली आहे. यंदा श्री येडेश्वरी देवीची यात्रा अतिशय मोठ्या प्रमाणात भरली असुन देवीच्या यात्रेचा चुना वेचण्याचा मुख्य कार्यक्रम आज शुक्रवारी (ता.३) रोजी मोठया उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी राज्यासह बाहेर राज्यातील पंधरा लाखांच्या वर भाविक येरमाळा नगरीत दाखल झाले होते. येडेश्वरी देवीची पालखी मंदिरावरुन चुन्याच्या रानात येताच लाखों भाविकांनी चुनखडीचे खडे वेचुन पालखीवर टाकत आई राधा उदे उदेचा एकच जय घोष केला. भाविकांच्या या गजराने चुन्याच्या रानाचा परिसर दुमदुमून गेला होता.

आज सकाळी ८ वा. येडेश्वरी देवीची पालखी डोंगरावरील मंदिरातुन पाच दिवस चालणाऱ्या यात्रेसाठी आमराई मंदिराकडे हालगी,जहांज,संबळाच्या गजरात वाजत गाजत निघाली. मुख्य चुन्याच्या रानात पालखी ११ वा. येताच भाविकांनी आई राधा उदे उदे, येडुसरीचा उदे उदेच्या जयघोष करताच



चुन्याच्या रानाचा परिसर भाविकांच्या गजराने दणाणून निघाला. श्री येडेश्वरी देवीच्या मंदिराला यात्रे नंतर पालखी डोंगरावरील मुख्य मंदिरात परत गेल्या नंतर चुन्याने रंगावण्याची पूर्वापार परंपरा चालत आली आहे. त्यामुळे चुना वेचण्याचा कार्यक्रम यात्रेचा मुख्य कार्यक्रम मानला जातो.

चुना वेचण्यासाठी यात्रेला येण्याची परंपरा भाविकांच्या पिढ्यान पिढ्या चालत आलेली प्रथा असल्याने मजूर, शेतमजूर, बिगारी, चाकरमाने कर्मचारी, लहान मोठे व्यावसायिक, व्यापारी, भाविक राज्यभरातून न चुकता दरवर्षी चुना वेचण्यासाठी दाखल होतात. काळानुरुप या यात्रेला येणाऱ्या भाविकांची संख्या प्रतिवर्षी वाढतच गेल्याने आता ती लाखोंच्या संख्येवर पोहचली आणि श्री येडेश्वरी देवीची यात्रेला राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी यात्रा असा मान प्रशासन स्तरावर आल्याने यात्रा पार पाडण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनावर आली आहे.

श्री येडेश्वरी देवीच्या चुना वेचण्याच्या कार्यक्रमाला वेगळे महत्व असुन यात्रेत या दिवशी येणाऱ्या पालखीवर चुन्याच्या रानात पालखी येताच चुन्याचे पाच खडे वेचून पालखीवर टाकण्यासाठी लाखों भाविकांची झुंबड उडते. त्यामुळे भाविकांची आपले चुन्याचे खडे पालखीवर पडावे यासाठी स्पर्धाच लागली आहे की काय असे चित्र दिसत होते. यात्रेत भाविकांनी वेचलेला चुना गोवऱ्याची भट्टी लावुन भाजला जातो.

यात्रेनंतर पालखी मुख्य मंदिरात पोहचल्याच्या दुसऱ्या दिवशी देवीचे मंदिर चुन्याने रंगवले जाते. त्यामुळे यात्रेत चुना वेचण्याचा प्रथा रुढ झाल्याचे जाणकारांचे मत आहे. ही परंपरा पिढ्यान पिढ्या चालत आली असुन चुन्याच्या रानात पालखी येताच चुनखडीचे कडे आपोआप रानात येतात असे लोक सांगतात.

पूर्वीच्या तुलनेत चुन्याच्या रानात लोकवस्ती वाढली असली तरी दरवर्षी भाविकांच्या हाती चुनखडी कशी येते ती पिढ्यानपिढ्या चालत आलेली आज पर्यंत ही प्रक्रिया लुप्त का झाली नाही. चुन्याचे खडे आपोआपवर येतात. यावर देवी येडेश्वरी जागृत देवी असण्याचा भाविकांना विश्वास येतो. त्यामुळेच भाविकांची तोबा गर्दी होते. यात्रेचे स्वरुपही यामुळेच वाढले आहे.

११ वाजता चुन्याच्या रानातून देवीची पालखी निघुन १२.३० र वा. आमराई मंदिरातील पालखी मंदिरात पोहचली येथेही पालखी दर्शनासाठी भाविकांनी दिवसभर गर्दी केली होती.

श्री येडेश्वरी देवीच्या यात्रेसाठी पोलीस प्रशासनाने विविध उपाय योजना आखून तगडा बंदोबस्त केला होता. आज पालखी मुख्यमंदिरातुन पोलिस प्रशासनाच्या कमांडो, दंगल नियंत्रण पथक, देवस्थान सयंसेवक, स्थानिक ग्रामसुरक्षा दलाच्या संरक्षण कड्यात निघाल्याने सुरक्षित पणे पालखी मिरवत आली. यावेळी ग्रामपंचायतचे पदाधिकारी, देवस्थानचे पुजारी, मानकरी, पालखी सोबत होते.

भाविकांना पिण्याच्या पाण्यासाठी ठीक ठिकाणी पाण्याच्या टँकरची व्यवस्था करण्यात आली होती.भारतीय स्टेट बँकेच्या वतीने थंड आरओ पाण्याच्या पानपोईची व्यवस्था करण्यात आली होती.

आंघोळीच्या पाण्याची मोफत सोय येरमाळा येथील नितीन कवडे व परिवाराकडून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी येडेश्वरीच्या भक्तांना त्यांच्या शेतातील बोअरवेल द्वारे रस्त्यालगत मोफत आंघोळीसाठी पाण्याची सोय केली गेली.

### पालखीच्या स्वागतासाठी भाविकांची झुंबड…

देवीच्या पालखीचे आज चैत्र पोर्णिमा यात्रेनिमित्त आमराई मंदिराकडे आगमन होणार असल्याने स्थानिक भविकात मोठा उत्साह होता. पालखीच्या स्वागतासाठी गावातील महिला भाविकांनी बाजारचौक, वाणीगल्ली, रोकडेश्वर मारुती मंदिर चौक, छत्रपती मार्केट, संभाजी नगर रस्त्यावर मोठं मोठया रांगोळी, फुलांच्या रांगोळीची सजावट केली होती.

### हेलीकॉप्टरने पालखीवर पुष्पवृष्टी…

आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या वतीने तुळजाभवानीचे महंत तुकोजी बुवा यांच्या हस्ते दरवर्षीप्रमाणे यंदाही पालखी चुन्याच्या रानात आल्यानंतर हेलीकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली. लाखो भाविकांनी हा सुखद क्षण अनुभवला. त्यावेळी सर्व भाविकांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले होते.

### बीडपर्यंत वाहतूक कोंडी…

यंदाची यात्रा म्हणजे भाविकांच्या जमलेल्या अलोट गर्दीने आज पर्यंतचे विक्रम मोडीत काढणारी यात्रा ठरली. चुना वेचण्याच्या कार्यक्रमानंतर परत फिरलेल्या भाविकांच्या वाहनांमुळे राष्ट्रीय महामार्ग सोलापूर ते बीड पर्यंत वाहतूक कोंडी झाल्याने विस्कळीत सेवा झाली होती. ही वाहतुक कोंडी सोडवण्यात पोलीस प्रशासन अक्षरशः अपयशी ठरल्यामुळे आ. राणा पाटील, आ. कैलास पाटील हे जवळ जवळ चार तास ट्रॅफीक मध्ये अडकले होते. रात्री उशीरापर्यंत वाहतुक व्यवस्था सुरळीत करण्यात येरमाळा पोलीसांची दमछाक झाली.

### विक्रमी गर्दीमुळे मोबाईल सर्व्हर डाऊन…

बुधवारी पहिल्या पोर्णिमेपासूनच भाविक लाखोंच्या संख्येने येरमाळ्यात दाखल होत होते. भाविकांची विक्रमी संख्या दाखल झाल्याने प्रत्येकाच्या हाती असलेले प्रत्येक कंपनीचे स्मार्ट फोन कव्हरेज मिळतं नसल्याने शोभेची वस्तु ठरले. यामुळे २ तारखेचा दुपार पासून ३ तारखेपर्यंत ७ वाजेपर्यंत ऑनलाइन खरेदी, विक्री व्यवहार सर्व्हर डाऊन असल्याने बंद राहिले. प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींचीही वृत्तसंकलन करताना मोठी अडचणी येत होत्या यात्रा परिसर सोडून दहा किमी बाहेर गेल्यावर वृत्तकामी सर्व्हर उपलब्ध झाले.

# येडेश्वरी यात्रेत शिवसेना जिल्हाप्रमुख अजित पिंगळेतर्फे महाअन्नदान

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.३ एप्रिल -**

धाराशिव जिल्ह्यातील प्रसिद्ध येडेश्वरी देवी मंदिर येथे चैत्र पौर्णिमेनिमित्त भरलेल्या यात्रेला दरवर्षीप्रमाणे यंदाही लाखो भाविकांनी हजेरी लावली. महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश व तेलंगणा येथून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी दाखल झाले असून परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.





या यात्रेत भाविकांच्या सेवेसाठी विविध उपक्रम राबवले जात असून, याच पार्श्वभूमीवर शिवसेना जिल्हाप्रमुख अजित पिंगळे यांच्या वतीने भव्य महाअन्नदानाचे आयोजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा उपक्रम मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

या अन्नदान सेवेत तब्बल १२०० किलो खिचडीचे वाटप करण्यात आले. यात्रेसाठी आलेल्या भाविकांना गरम, ताजे व स्वच्छ अन्न मिळावे यासाठी विशेष नियोजन करण्यात आले होते.

## भविकांना १२०० किलो खिचडीचे वाटप

दिवसभर चाललेल्या या उपक्रमाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. हा सेवा उपक्रम यशस्वी करण्यासाठी कळंब व धाराशिव तालुक्यातील शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

स्वयंपाक, नियोजन, वितरण व व्यवस्थापनाच्या सर्व जबाबदाऱ्या समन्वयाने पार पाडत संपूर्ण कार्यक्रम सुरळीत पार पडला. अन्नदान हे श्रेष्ठ दान या भावनेतून प्रेरित होऊन अजित पिंगळे यांच्या वतीने दरवर्षी हा उपक्रम राबवला जातो.

या सेवेमुळे यात्रेत सहभागी होणाऱ्या गरजू व दूरवरून आलेल्या भाविकांना मोठा दिलासा मिळतो.

या उपक्रमाबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त करत अजित पिंगळे यांचे आभार मानले असून, अशा सेवाभावी कार्यामुळे यात्रेचे सामाजिक महत्त्व अधिक अधोरेखित होत असल्याची भावना व्यक्त केली.

### येरमाळा येथील चैत्र यात्रेतील महत्वाचे क्षणचित्रे.. (सर्व छाया : सुखदेव गायके, येरमाळा)


हलगीच्या तालावर ठेका धरताना महिलांचा उत्साह…


देवीच्या पालखी मार्गावर भाविकाकडून फुलांचे अंथरुण…


मुख्य मंदिरातून आमराईकडे प्रस्थान करताना पालखी…


देवी दर्शनार्थ वाजत-गाजत दाखल झालेले भाविक भक्त…


चूनखडी वेचण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी…


यात्रेत अन्नदानाचा लाभ घेताना महिला भाविक…

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## भाविकांकडून तुळजाभवानी मंदिर संस्थानास एक लाख रुपये देणगी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ एप्रिल -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीजींच्या चैत्र पौर्णिमा उत्सवाच्या निमित्ताने विविध भागांतील भाविक मोठ्या श्रद्धेने देवीजींचे दर्शन घेत आहेत. याच पार्श्वभूमीवर कर्नाटक राज्यातील बिजापूर येथील भाविक नामदेव शराणाप्पा डांगे यांनी देवीवरील अपार श्रद्धा व भक्तीभाव व्यक्त करत श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानास रुपये १,०१,०००/- (एक लाख एक हजार रुपये) इतकी देणगी अर्पण केली.



यावेळी मंदिर संस्थानच्या वतीने धार्मिक व्यवस्थापक अनुप ढमाले, रामेश्वर वाले, ओंकार काटकर यांनी नामदेव शराणाप्पा डांगे यांचा सत्कार करुन मनःपूर्वक आभार मानले.

## ⏩ संक्षिप्त वृत्त...



### परंड्यात जि.प. अध्यक्षा अर्चना पाटील यांची सदिच्छा भेट

**परंडा, दि.३ एप्रिल -**

जिल्हा परिषद धाराशिव च्या नवनिर्वाचित अध्यक्षा अर्चना पाटील यांनी परंडा येथील भाजपा संपर्क कार्यालयाला सदिच्छा भेट देत भाजपा नेते सुजितसिंह ठाकूर यांच्यासोबत विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी सुजितसिंह ठाकूर यांनी अर्चना पाटील यांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी भाजपाचे ॲड. गणेश खरसडे, अरविंद रगडे, समरजीतसिंह ठाकूर, धनाजी गायकवाड, तानाजी पाटील, उमाकांत गोरे, अविनाश विधाते, अजित काकडे, प्रियांका क्षीरसागर, नुतन खोसरे, जोती भातलवंडे, गायत्री तिवारी, शुभदा शेलार यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### नळदुर्गात हनुमान जन्मोत्सव उत्साहात

**नळदुर्ग, दि.३ एप्रिल -**

नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र रामतीर्थ तसेच शहरातील विविध हनुमान मंदिरात दि. २ एप्रिल रोजी हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. याही वर्षी श्रीक्षेत्र राम तीर्थसह रोकडया हनुमान मंदिर, शास्त्री चौक, मराठा गल्ली, आलियाबाद येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिर, ब्राह्मण गल्ली, व्यंकटेशनगर, व्यासनगर, जगतापनगर आदी भागातील मंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व मंदिरांवर आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांची सजावट करण्यात आली होती. मराठा गल्ली येथील हनुमान मंदिरात रात्री भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रोकडया हनुमान मंदिरात बाळासाहेब कुलकर्णी यांच्या वतीने भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. दुपारी श्री धाम वृंदावन येथील द्वारका कृष्ण शास्त्री यांनी हनुमान कथेचे प्रभावी वाचन केले.



### महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव समिती अध्यक्षपदी राहुल बताले

**नळदुर्ग, दि.३ एप्रिल -**

क्रांतीसूर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज जन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी राहुल बताले यांची निवड करण्यात आली असून त्यांच्या निवडीचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : उपाध्यक्षपदी सोमेश्वर बदुले, सचिन कलशेट्टी सचिवपदी संकेत स्वामी, संकेत खद्दे सहसचिवपदी विरेंद्र बेडगे, दर्शन मुळे कोषाध्यक्षपदी शशांक खाटमोडे, अर्जुन गोगावे तसेच मिरवणूक प्रमुख म्हणून मयुर बचाटे, अक्षय बताले, राहुल कलशेट्टी, अभिषेक व्हनाळे, धीरज शंकरशेट्टी, संकेत कसेकर, सोमनाथ रेड्डी, अमर कलशेट्टी, रोहित कलशेट्टी, श्रीनिवास मुळे व सागर मुळे यांची निवड करण्यात आली आहे.



### नारंगवाडीत हनुमान जयंती साजरी

**उमरगा, दि.३ एप्रिल -**

तालुक्यातील नारंगवाडी येथील हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त पूजा, अभिषेक व आरती करून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.हनुमान जयंती ग्रुपच्या वतीने आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष अंकुश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विधी पार पडले. लखन जाधव यांची उपस्थिती लाभली. महाप्रसादासाठी विनोद कांबळे, बाळू चव्हाण, शरद कदम व महेश मुगळे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमासाठी ग्रामस्थ व हनुमान भक्त उपस्थित होते.

## अवकाळी पावसाचा कहर; शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३ एप्रिल -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात शेतकऱ्यांच्या नशिबी पुन्हा एकदा 'दुष्काळात तेरावा महिना' अशी परिस्थिती ओढवली आहे. काल झालेल्या अवकाळी पावसामुळे रबी हंगामातील गहू, ज्वारी, हरभरा या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

आधीच दुष्काळाच्या छायेत असलेल्या शेतकऱ्यांना या अनपेक्षित पावसाने जबर फटका बसला असून अनेक शेतकरी हवालदिल झाले आहेत. यासोबतच बागायती पिकांनाही मोठा फटका बसला आहे.

केळी, कांदा, टरबूज, खरबूज या पिकांचे मोठे नुकसान झाले असून जोरदार वाऱ्यामुळे केळीची झाडे आडवी पडल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. तसेच चालू हंगामातील आंबा पिकावरही या पावसाचा विपरीत परिणाम झाला असून झाडाखाली गळून पडलेले आंबे अनेक ठिकाणी दिसून येत आहेत.



या नैसर्गिक संकटामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शासनाने शेतकऱ्यांना त्वरित मदत जाहीर करावी, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

## धाराशिव बसस्थानकात प्रवाशाच्या गळ्यातील सोन्याचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ एप्रिल -**

शहरातील बसस्थानक परिसरात पहाटेच्या सुमारास प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याबाबत आनंदनगर पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या फिर्यादीनुसार, नंदा विठ्ठल पाटील (वय ६५, रा. खानापूर, ता. जि. धाराशिव) या दि. १ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ५.३० ते ६.०० वाजताच्या दरम्यान धाराशिव बसस्थानकात खानापूरकडे जाणाऱ्या बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी गर्दीचा फायदा घेत छकुली महेश शिंदे (वय २०, रा. गेवराई, जि. बीड) हिने त्यांच्या गळ्यातील सुमारे ८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, अंदाजे ४५ हजार रुपये किमतीचे, चोरून नेल्याचा आरोप आहे.



या प्रकरणी नंदा पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## तुळजापूरात एक लाखांची खंडणी मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ एप्रिल -**

शहराजवळील मंगरुळ इटकळ रोडवर दत्त मंदिरासमोर एक धक्कादायक प्रकार घडला असून पवनचक्कीचे पाते वाहतूक करणाऱ्या व्यक्तीस अडवून खंडणीची मागणी करत मारहाण व लूट केल्याची घटना समोर आली आहे.

याबाबत तुळजापूर पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या फिर्यादीनुसार, फिर्यादी रामेश्वर शिवानंद तानवडे (वय ३८, रा. आरळी बु. ता. तुळजापूर) हे दि.१ एप्रिल रोजी दुपारी सुमारे ३ वाजता मंगरुळ इटकळ रोडवरील दत्त मंदिरासमोरून पवनचक्कीचे पाते वाहून नेत असताना आरोपी गणेश सरडे व भाऊसाहेब सरडे (दोघे रा. सरडेवाडी, ता. तुळजापूर) यांनी मोटारसायकलवर येऊन त्यांच्या वाहनासमोर गाडी आडवी लावून त्यांना थांबवले. यानंतर तू आमच्या हद्दीतून गाडी कशी घेऊन जातोस? असा जाब विचारत आरोपींनी एक लाख रुपयांची मागणी केली. तसेच शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व बेल्टने मारहाण केली. या दरम्यान फिर्यादीच्या खिशातील ५ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## जयंतीनिमित्त मुक्या प्राण्यांसाठी पाण्याच्या टाक्या

### दयावान प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३ एप्रिल -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कळंब येथील दयावान प्रतिष्ठानच्या वतीने एक समाजोपयोगी आणि मानवतावादी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर मुक्या प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याच्या सिमेंट टाक्या बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दयावान प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष इम्रान मुल्ला यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सध्या तापमानात सातत्याने वाढ होत असून ग्रामीण व शहरी भागात भटक्या जनावरांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.



अनेकदा पाण्याअभावी जनावरांची अवस्था बिकट होत असल्याचे चित्र दिसून येते.

या पार्श्वभूमीवर प्रतिष्ठानने पुढाकार घेत कळंब व डिकसळ परिसरातील विविध ठिकाणी सिमेंटच्या पाण्याच्या टाक्या बसविण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामुळे जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध होणार असून स्थानिक नागरिकांकडूनही या उपक्रमाचे स्वागत केले जात आहे. विशेष म्हणजे, हा उपक्रम केवळ जयंतीपुरता मर्यादित नसून दीर्घकालीन स्वरूपात राबविण्यात येणार आहे.

टाक्यांमध्ये नियमित पाणी उपलब्ध राहील यासाठीही नियोजन केले जात आहे.



दरम्यान, ज्या ठिकाणी पाण्याची सोय उपलब्ध आहे, अशाच ठिकाणी टाक्या बसविण्यात येणार असल्याचे प्रतिष्ठानतर्फे स्पष्ट करण्यात आले असून नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## खामसवाडी परिसरात वादळी पावसाचा तडाखा; आंबा पिकांचे मोठे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.३ एप्रिल -**

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने खामसवाडी व परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, हरभरा, पावटा या पिकांसह भाजीपाला व आंबा पिकांनाही मोठा फटका बसला आहे.

गतवर्षी उशिरापर्यंत झालेल्या पावसामुळे यावर्षी रब्बी पेरणीत उशीर झाला होता. सध्या काही ठिकाणी काढणी सुरू असताना, तर काही ठिकाणी पिके उभी असतानाच आलेल्या वादळी पावसाने शेतकऱ्यांचे कष्ट वाया घालवले आहेत. लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांनी उपजीविकेसाठी घेतलेला भाजीपाला पूर्णपणे जमीनदोस्त झाला आहे.

खामसवाडी शेजारील नागझरवाडी येथील शेतकरी रामचंद्र श्रीमंत साळुंखे यांचा एक एकर दोडका पिकाचा पूर्ण नाश झाला. विक्रीसाठी तयार असलेला भाजीपाला डोळ्यादेखत नष्ट झाल्याने मोठे आर्थिक नुकसान झाल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.दरम्यान, परिसरातील आंबा पिकालाही मोठा फटका बसला असून झाडांवरील छोटे आंबे मोठ्या प्रमाणात गळून पडले आहेत. यामुळे येत्या उन्हाळ्यात आंब्याचे दर वाढण्याची शक्यता व्यापारी वर्गातून व्यक्त केली जात आहे. या नुकसानीबाबत अद्याप प्रशासनाकडून पंचनामे करण्यात आलेले नाहीत. स्थानिक लोकप्रतिनिधींनी कृषी व महसूल विभागाला माहिती दिली असली तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या बांधावर कोणतीही प्रशासकीय टीम पोहोचलेली नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे.




नुकसानग्रस्त रब्बी पिके, भाजीपाला व आंबा यांचे तात्काळ पंचनामे करून शासनाने योग्य ती आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

## नळदुर्ग नगरपालिकेच्या सलग तीन सभा रद्द; चर्चांना उधाण

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ एप्रिल -**

नळदुर्ग नगरपालिकेत सत्ताधारी भाजप व शिंदे सेनेला स्पष्ट बहुमत असतानाही महत्त्वाच्या तीन सभा सलग रद्द झाल्याने शहरात आश्चर्य व चर्चांना उधाण आले आहे.

नगरपालिकेत २० पैकी ११ जागांवर भाजप-शिंदे सेनेचे नगरसेवक निवडून आले असून, जनतेतून निवडून आलेले नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्यासह एकूण १२ सदस्यांचे बहुमत आहे. तर काँग्रेसचे ९ नगरसेवक असून ते प्रभावी विरोधकांची भूमिका बजावत आहेत. दरम्यान, भाजपच्या ९ नगरसेवकांच्या मागणीनुसार दि.१ एप्रिल रोजी विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र ही सभा अचानक रद्द करण्यात आली. या सभेत शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे विषय चर्चेसाठी ठेवण्यात आले होते. यामध्ये सिटी सर्व्हे, मुख्य रस्ते व आरक्षित जागांवरील अतिक्रमण हटविणे, डीपी रस्त्यांसाठी भूसंपादन, वक्फ बोर्डाच्या जागेचा प्रश्न तसेच शहर हद्दवाढ यांसारख्या मुद्द्यांचा समावेश होता.




विशेष म्हणजे याच दिवशी सकाळी ११ वाजता होणारी स्थायी समितीची बैठकही रद्द करण्यात आली. या बैठकीत सिमेंट रस्ते व गटारीच्या कामांबाबत दिलेले टेंडर रद्द करून नुकसानभरपाई वसूल करण्याचा महत्त्वाचा निर्णय अपेक्षित होता. तसेच दि.३१ मार्च रोजी नियोजन व विकास समितीची बैठकही रद्द झाली होती. या बैठकीत बोरी नदीतील गाळ काढणे, शहर विकास आराखडा तसेच नगरपालिकेची नवीन इमारत उभारणी यांसारखे विषय होते.

सलग तीन महत्त्वाच्या सभा रद्द होणे ही नगरपालिका इतिहासातील दुर्मिळ बाब मानली जात असून, यामागील नेमके कारण काय, असा सवाल उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे या कोणत्याही विषयांना विरोधकांकडून आक्षेप नसताना सभा का रद्द करण्यात आल्या, याबाबतही चर्चा रंगल्या आहेत.

## पादचारी ठार

**उमरगा, दि.३ एप्रिल -**

तालुक्यातील माडज पाटी रोडवर झालेल्या अपघातात पादचारी बंडू मारुती कातपुरे (रा. माडज) यांचा मृत्यू झाला.

दि.३० मार्च रोजी पहाटे पायी जात असताना मोटरसायकल चालकाने निष्काळजीपणे धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले. चालकाने जखमीस उपचारासाठी न नेता घटनास्थळावरून पळ काढला.

## 'गाव बेरोजगार मुक्त अभियान' अंतर्गत ३ हजार युवकांना रोजगाराची संधी



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३ एप्रिल -**

देशातील वाढत्या बेरोजगारीच्या पार्श्वभूमीवर युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रथम एज्युकेशन फाउंडेशन, मुंबई ही संस्था गेल्या २० वर्षांपासून कार्यरत आहे. देशभरातील सुमारे ३०० केंद्रांद्वारे लाखो युवकांना शिक्षण व कौशल्याधारित प्रशिक्षण देऊन रोजगार मिळवून देण्यात संस्थेला यश आले आहे.

याच धर्तीवर 'गाव बेरोजगार मुक्त अभियान' अंतर्गत उमरगा व लोहारा तालुक्यातील सुमारे ३ हजार युवकांना नोकरी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे जिल्हा संपर्क अधिकारी प्रा. सुमीत कोथिंबीरे यांनी दिली.

शहरातील कस्तुरबा मंगल कार्यालय येथे दि. १ एप्रिल रोजी सामर्थ्य कल्याणकारी संस्था, उमरगा यांच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय भटके-विमुक्त युवक मेळावा व सांस्कृतिक महोत्सवात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर बहुजन महासंघचे प्रदेशाध्यक्ष धीरज बेळंबकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून सरिता उपासे, प्रथम संस्था किल्लारीचे प्राचार्य गोपीनाथ कांबळे तसेच धाराशिवचे प्राचार्य सोमनाथ घोडके उपस्थित होते.

युवकांमध्ये क्रीडा क्षेत्राची आवड निर्माण व्हावी यासाठी संस्थेतर्फे कदेर येथे 'बंधुता चषक' तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. मुलींच्या कबड्डी स्पर्धेत सरदारनगर तांडा (कदेर) प्रथम, तुगाव तांडा द्वितीय, तर देवीनगर तांडा (कराळी) उत्तेजनार्थ ठरले. मुलांच्या व्हॉलीबॉल स्पर्धेत सेवालालनगर तांडा (अचलेर) प्रथम, कृष्णानगर तांडा (जकेकूरवाडी) द्वितीय, तर देवीनगर तांडा (कराळी) उत्तेजनार्थ ठरले. विजेत्यांना रोख पारितोषिक व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमात धीरज बेळंबकर, सरिता उपासे, प्राचार्य गोपीनाथ कांबळे व प्राचार्य सोमनाथ घोडके यांनी युवकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेच्या अध्यक्षा सौ. बबिता राठोड व सचिव रंजिता पवार यांनी केले. सूत्रसंचालन पूजा राठोड व दिशा राठोड यांनी केले, तर आभार प्रदर्शन मनीषा जाधव यांनी केले.

## विकासाचा नवा अध्याय : महापुरुषांच्या पुतळ्यांवर निर्णायक चर्चा ८ एप्रिलला

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३ एप्रिल -**

> परंडा नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत सत्ताधारी नगरसेवक आणि विरोधी जनशक्ती नगर विकास आघाडीच्या नगरसेवकांमध्ये शहरातील विविध विषयांसह महापुरुषांच्या पुतळ्यांसाठी 'ना-हरकत प्रमाणपत्र' देण्याच्या मुद्द्यावर वादळी चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

परंडा शहरात सांस्कृतिक ओळख अधिक भक्कम करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा गाठला जाणार आहे. शहरातील प्रमुख चौकांमध्ये महापुरुषांचे पुतळे उभारण्याच्या प्रस्तावासंदर्भात 'ना-हरकत प्रमाणपत्र' (छजउ) देण्याच्या महत्त्वपूर्ण विषयावर ८ एप्रिल २०२६ रोजी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत सखोल चर्चा होणार आहे.

नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी १२:३० वाजता होणाऱ्या या बैठकीत शहराच्या सौंदर्यीकरणासोबतच ऐतिहासिक वारसा जपण्याच्या दृष्टीने निर्णायक पावले उचलली जाण्याची अपेक्षा आहे. प्रस्तावित पुतळ्यांसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचा निर्णय हा या सभेचा केंद्रबिंदू ठरणार असून, यामुळे शहरातील प्रमुख चौकांना नवे स्वरूप मिळण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो.



या बैठकीत छत्रपती शिवाजी महाराज चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, महात्मा फुले चौक, टीपू सुलतान चौक, महाराणा प्रताप चौक आणि निळा झेंडा चौक यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणांचा समावेश असून, त्या ठिकाणी महापुरुषांचे पुतळे उभारण्यासंदर्भात विचारविनिमय करून अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. याशिवाय, करदात्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी 'अभय योजना' लागू करण्याबाबतही या सभेत महत्त्वपूर्ण निर्णय अपेक्षित आहे. ही योजना लागू झाल्यास थकीत मालमत्ता करावरील दंड किंवा व्याजात सवलत मिळण्याची शक्यता असून, यामुळे पालिकेच्या कर वसुलीतही गती येऊ शकते.

एकूणच, ही सभा परंडा शहराच्या विकास, अर्थव्यवस्था आणि सांस्कृतिक अस्मितेशी निगडित ठरणार आहे. प्रस्तावित निर्णयांमुळे शहराच्या वैभवात भर पडण्याची अपेक्षा असून, या बैठकीकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

